**<u>ठळक बातम्या</u>**

- पारंपरिक वस्त्रोद्योग हे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचं प्रतीक आणि आत्मनिर्भरतेच्या वाटचालीतला आधार असल्याचं प्रधानमंत्र्याचं मन की बातमधे प्रतिपादन

- निसार अर्थात नासा-इस्त्रो सिंथेटिक अपर्चर रडार मोहिम येत्या बुधवारी सुरु होणार

- थायलंड-कंबोडिया सीमेवर आज चौथ्या दिवशीही युद्ध सुरूच

- हरिद्वारच्या मनसादेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू

**आणि**

- इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची आघाडी सुरु

**<><><><><>**

पारंपरिक वस्त्रोद्योग हे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचं प्रतीक असून आत्मनिर्भरतेच्या वाटचालीतला मोठा आधार असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रम मालिकेच्या १२४ व्या भागात ते आज बोलत होते. आगामी ‘राष्ट्रीय हातमाग दिवसाचा उल्लेख करुन, सध्या देशभरात तीन हजारापेक्षा जास्त वस्त्रोद्योग स्टार्ट-अप्स सक्रिय असल्याची माहिती त्यांनी दिली.

पैठण इथल्या पैठणी विणकर कविता ढवळे यांचा उल्लेख केला. कविता ढवळे यांनी यासंदर्भात आकाशवाणीशी बोलतांना आनंद व्यक्त केला.

**- होल्ड - बाईट - पैठणी विणकर, कविता ढवळे**

अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांची मोहीम यशस्वी झाली, त्यानंतर इन्स्पायर-मानक या उपक्रमात सहभागी होणाऱ्या मुलांची संख्या दुप्पटीनं वाढली असल्याचं

त्यांनी सांगितलं. येत्या २३ ऑगस्टला साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनासाठी आपल्या कल्पना, नमो ॲप वर पाठवण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. मराठा साम्राज्याच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोची मान्यता सर्व देशवासियांसाठी अभिमानाची बाब आहे असं मोदी म्हणाले.

भजन - कीर्तनातून होणाऱ्या जनजागृतीबद्दल ते म्हणाले, की आपल्या लोकपरंपरा केवळ इतिहास नव्हे तर समाजाला दिशा देण्याचं साधन आहे, असं ते म्हणाले. वर्तमान आणि इतिहासाच्या दस्तऐवजीकरणाच्या अनुषंगानं हस्तलिखितांचं महत्त्वही प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केलं.

**- होल्ड - बाईट - MKB HASTALIKHITE**

जैवविविधतेची ओळख होण्यासाठी पक्षी निरीक्षणासारख्या छंदाना प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

माओवादी हिंसाचार संपुष्टात आणून त्यात गुंतलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्नही त्यांनी मांडले.

खेलो भारत निती २०२५ अंतर्गत खेळांशी संबंधित स्टार्टअप्सना सर्व प्रकारची मदत केली जाईल, असं ते म्हणाले. खेळ हा तंदुरुस्ती, आत्मविश्वास आणि एक मजबूत भारत निर्माण करण्याचा मार्ग आहे, म्हणून भरपूर खेळा, असं आवाहन त्यांनी केलं. स्वच्छ भारत मोहिमेला लवकरच ११ वर्षे पूर्ण होणार असल्याची आठवण त्यांनी करून दिली. स्वच्छता हे एका दिवसाचं काम नाही, आपण वर्षातील प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी स्वच्छतेला प्राधान्य देऊ, तेव्हाच देश स्वच्छ राहील असा सल्ला त्यानी श्रोत्यांना दिला.

**<><><><><>**

निसार अर्थात नासा-इस्रो सिंथेटिक अपर्चर रडार उपग्रहाच्या प्रक्षेपणामुळे इस्रोच्या आंतरराष्ट्रीय सहयोगात वाढ होईल, असं केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहरांशी बोलत होते. निसारचा उपयोग

केवळ भारत आणि अमेरिकेला होणार नसून जगभरातल्या देशांना महत्त्वाचा डेटा मिळण्यासाठी याचा उपयोग होईल, असं ते म्हणाले. आपत्ती व्यवस्थापन, शेती आणि हवामान निरीक्षण अशा क्षेत्रासाठी हे महत्त्वाचे ठरणार आहे. ३० जुलै रोजी श्रीहरीकोटा इथून निसार मोहिमेला सुरुवात होणार आहे.

**<><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंदीचं आवाहन करूनही थायलंड-कंबोडिया सीमेवर आज चौथ्या दिवशीही युद्ध सुरू आहे. थायलंडच्या सुरिन प्रांतातल्या नागरी वस्त्यांवर तसंच सीमेवरच्या अनेक भागात कंबोडिया तोफगोळे डागत असल्याचा आरोप थायलंडच्या परराष्ट्र मंत्रालयानं केला आहे. थायलंडनेही प्रत्युत्तरादाखल अनेक ठिकाणी ड्रोन, रणगाडे आणि हवाई बॉम्बहल्ले केले आहेत. या हल्ल्याचा कंबोडियानं निषेध केला असून थायलंडचा हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा आरोपही केला आहे.

**<><><><>**

राजा चोल आणि राजेंद्र चोल या राजांचा वारसा ही भारताची ओळख आणि अभिमानाचं प्रतीक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज तामिळनाडूमध्ये अरियालूर इथं चोल सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या जयंती निमित्त आयोजित आदि तिरुवतीराई उत्सवाच्या समारोप समारंभात बोलत होते. त्यांनी सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या सन्मानार्थ विशेष नाणं यावेळी प्रकाशित केलं.

मोदी यांनी या तामिळनाडू दौऱ्यात सुमारे ४५० कोटी रुपये खर्चाच्या तुथुकोडी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं लोकार्पण केलं. तसंच ४ हजार ८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं.

**<><><><>**

उत्तराखंडमधे हरिद्वारच्या मनसादेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला. उच्च दाबाची विजेची तार दर्शनासाठी जमलेल्या भाविकांच्या गर्दीवर कोसळून ही दुर्घटना झाली. उत्तराखंड पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, आणि इतर यंत्रणांची पथकं बचावकार्य करीत आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचं अर्थसहाय्य जाहीर केलं असून दुर्घटनेच्या दंडाधिकारीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

अँडरसन - तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात, आज पाचव्या आणि अखरेच्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात इंग्लंडवर आघाडी घ्यायला सुरुवात केली आहे. पहिल्या डावात इंग्लंडनं ३११ धावांची आघाडी मिळवली होती. भारतानं दुसऱ्या डावात कालच्या २ बाद १७४ धावांवरून आज सकाळी पुढं खेळायला सुरुवात केली. त्यानंतर के.एल. राहुल बाद झाला. त्याचं शतक थोडक्यात हुकलं, त्यानं ९० धावांची खेळी केली. त्यानंतर कर्णधार शुभमन गीलही वैयक्तिक शतक पूर्ण केल्यावर १०३ धावांवर बाद झाला. त्यानंतर मात्र रविंद्र जडेजा आणि वाशिंगटन सुंदर यांनी संयमी भागिदारी करत इंग्लंडची आघाडी पार केली. दोघांनीही अर्धशतकं पूर्ण केली आहेत.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ बाद २२५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

फिड़े महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेतल्या अंतिम सामन्यातला दुसरा गेम आज ३४ खेळीनंतर अनिर्णित राहिला. दिव्या देशमुख हिने लागोपाठ चेक देऊन

कोनेरू हंपीला गेम अनिर्णित अवस्थेत सोडायला भाग पाडलं. पहिला गेम सुद्धा अनिर्णित राहिला होता. आता उद्या होणाऱ्या टाय ब्रेकरमधे या सामन्याचा विजेता ठरेल.

**<><><><><>**

माजी राष्ट्रपती डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या स्मृतीदिनानिमित्त देश आज त्यांना अभिवादन करीत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉ कलाम यांना समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. डॉ कलामांचे विचार नवीन पिढीला राष्ट्रनिर्माणाची प्रेरणा देत राहतील असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण करण्याच्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात उद्या सुनावणी होणार आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होण्याची शक्यता आहे. आगामी बिहार विधानसभा निवडणुकांच्या अगदी तोंडावर घेतलेल्या पुनरिक्षणाच्या निर्णयामुळं मोठ्या संख्येनं मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावं लागू शकतं असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

दरम्यान, बिहारमधल्या मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणासाठी ७ कोटी ९० लाख मतदारांपैकी ९२ टक्के मतदारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यांची छाननी केल्यावर पुढच्या महिन्याच्या एक तारखेपर्यंत मतदारांची नेमकी संख्या समजेल, असं निवडणूक आयोगानं आज सांगितलं.

**<><><><><>**

भारत–युके मुक्त व्यापार करार हे विकासाच्या दिशेनं एक धाडसी आणि परिवर्तनशील पाऊल असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल

यांनी म्हटलं आहे. या कराराविषयी विविध उद्योग आणि व्यापारी संघटनांनी मुंबईत आयोजित केलेल्या “यूके बाजारातील निर्यात संधी”या चर्चासत्रात आज ते बोलत होते. सरकार भारतीय उद्योजकांना जागतिक पातळीवर सुलभ, मुक्त आणि न्याय्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे, असं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात ठिकठिकाणी पावसाचा जोर अजून कायम आहे. नद्यांचे प्रवाह वाढले असून धरणांमधून अतिरिक्त पाणी सोडण्यात येत आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे पूर आलेल्या नाल्यात तीन जणांचा मृत्यू झाला. खडकवासला, पवना, वारणा, कोयना, कण्हेर, उरमोडी, तारळी, धोम,धोम - बलकवडी, विष्णुपुरी, उजनी इत्यादी धरणांमधून विसर्ग सुरु आहे. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असून नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**//<><><><><>//**